Gramin (ACS) Mahavidyalaya, Vasantnagar (Kot.) College Code 117 Tq. Mukhed Dist. Nanded

**Gramin ACS Mahavidyalaya, Vasantnagar (kotgyal)**

**Tq. Mukhed Dist. Nanded 43151**

Brief Report of the Activity

**Name of the Activity: water Management is the need of the time**

Chairman of this online programme :-Prof. Dr. H.B. Rathod (Principal GMV)

Inaugurator : Prof. Dr. Shivraj Bokade (Director of NSS SRTMU, Nanded)

Keynote Speaker :- Prof. Dr. Parmeshwar Paul. (Dept. of Geography, Shankarrao Chavan Mahavidyalaya, Ardhapur, Dist. Nanded

Date and Time -08/07/2021, 7.00 pm

Programme link:- htpps./meetgoogle.comjpr-yzrf

Objectives of this programme :-

To make awareness about water management in society. Everybody should be careful about water management. It a very essential today. To make understand the importance of water utilization and utility in day to day life.

This event was organized online mode on google meet . the program broucher and invitation was send to several whatsapp groups and collage students groups.

The chief speaker expressed his views and thoughts on the need of water management is very essential in human life.

In India natural resources are very rare when we compare with the Uropean countries. So we should be careful and conserve of water and other natural resources.N.S.S. PO S. Babarao introduced and prof. Dr. R. D. Badne introduced chief guest. N.S.S. program officer Kallimath S.K.anchored. The presidential adderss is given by Prof. Dr. H. B. Rathod. So many dignatories participated in this program.

Dr.Shivraj Bokade- - 942367352 / Email. shivrajbokade@gmail.com.

Dr.parmeshwar Paul — 9834496566 / 9096304978 - parmeshwargis@gmail.com

Dr.H.B.Rathod - 9423076156 rathod.haridas @ yahoo. com.

Dr. R.D.Badne - 9423437215 badnerd1968@gmail.com.

Program Officer
Programme Officer
National Service Scheme
Gramin (ACS) Mahavidyalaya Vasantnagar
Tq Mukhed Dist Nanded

Principal
Principal
Gramin Arts Comm. & Science
Mahavidyalaya, Vasantnagar (Kotgyal)
Tq Mukhed Dist. Nanded (M.S)

विमुक्त जाती सेवा समिती वसंतनगर संचलित...

# ग्रामीण (कला, वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालय

वसंतनगर ता.मुखेड जि.नांदेड

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित

# 'जल व्यवस्थापन काळाची गरज'

### एकदिवसीय राज्यस्तरीय वेबिनार







**अध्यक्ष**
**मा.प्रो.डॉ.हरिदास राठोड**
प्राचार्य, ग्रामीण (कला, वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालय वसंतनगर, कोटग्याळ ता. मुखेड जि. नांदेड

**उद्घाटक**
**मा.प्रा.डॉ.शिवराज बोकडे**
संचालक, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ ,नांदेड.

**प्रमुख वक्ते**
**मा.प्रा.डॉ.परमेश्वर पौळ**
भूगोल विभाग, शंकरराव चव्हाण महाविद्यालय अर्धापूर जि. नांदेड

### संयोजक

**प्रा. शंकरय्या कळीमठ**
कार्यक्रमाधिकारी रा.से.यो.
(९४२१८३८६८५)

**प्रा. एस. बाबाराव**
कार्यक्रमाधिकारी रा.से.यो.
(७०८३५९१४२५१)

**व सर्व सल्लागार समिती सदस्य, राष्ट्रीय सेवा योजना**
तंत्र सहाय्य – प्रा. डॉ. महेश पेंटेवार

दि.०८ जुलै २०२० सायंकाळी ०७.०० वाजता

**Google Meet Link**
htpps://meet.google.com/jpr-yzrf-ygs

9:08

# About this call

**People** | Info

Harshad Padekar

Husen Atar

Kajal Gorkhe

Kavita Lohale

kiran

manish achhay more

Narayan Panchal

Nitin Deshmukh

Nivrutti Naik

Omprakash Patge

Parmeshwar Poul

Parshuram Shinde

9:08

About this call

People | Info

D U GADGIL

datta dudhkawade

datta kamble

Devidas Kendre

Digambar Waghmare

DR ACHOIE PANDURA...

Dr. Kore GM

Dr. Mahesh Pentewar

Dr. Mahesh Pentewar


Dr. Nagorao Awade

Dr. Omprakash Darak


Dr.Anna Garad

Dr.Nitin Pawar

Principal
Gramin (Arts, Comm. & Science)
Mahavidyalaya Vasantnagar Kotgyal
[illegible] Nanded



7:35
jpr-yzrf-ygs
Aruna
Manohar
Sakharam
S.babarao
Shankarayya
Shivraj
You
Dr. Ma
70 others



4G 3G 62.8K/s
7:17 PM
84%
Aruna
M
Manohar
S.babarao
datta kamble is sharing their screen

दैनिक लोकरत्न
ओळख बदलत्या महाराष्ट्राची
Lokratna

लोकरत्न
आता वेबसाईटवर ही
www.
https://lokratna.com

# पाण्याची बचत म्हणजेच पाण्याची निर्मीती आहे : प्रा. डॉ. परमेश्वर पौळ

मुखेड / लोकरत्न प्रतिनिधी

आपण नैसर्गिक संसाधनाचा वापर स्वार्थासाठी करत आहोत. अनेक प्रगत राष्ट्र विकासाच्या नावावर पर्यावरणाचा -हास करताना दिसत आहेत. आपण इकोलॉजी ऐवजी इकॉनॉमीला अधिकचे महत्त्व देत आहोत.प्रत्येक जीवासाठी निसर्गाने मुबलक पाणी उपलब्ध केले आहे पण त्याचे व्यवस्थापन आपण व्यवस्थित करत नाहीत.

जलव्यवस्थापनात पाणी सर्व सजीवांना परिपूर्ण , समन्यायी मिळावे व त्याचा वापर कार्यक्षम होण्यासाठी प्रा. पौळ यांनी जलव्यवस्थापन हे तीन टप्प्यात करण्यास सांगितले. यात पहिला टप्प्यात जलसंसाधन विकास व्यवस्थापन, दुसरा टप्प्यात जल पुरवठा व्यवस्थापन व तिसरा टप्प्यात जल वापर व्यवस्थापन या तिन्ही टप्प्या पाणी साठेबंद व जलसाक्षरतेचा ही भूमिका महत्त्वाची दिले पाहिजे. सध्यस्थितीत केवळ पहिल्या टप्प्यातच जलव्यवस्थापन काही प्रमाणात होते पण तिन्ही टप्प्यात शंभर टक्के पाणी व्यवस्थापन झाले तर पाणीटंचाई राहणार नाही शिवाय परिसराचा शाश्वत विकास होईल. जलव्यवस्थापनात करत असताना पाणीसाठा, पाणीपुरवठा व वापर या व्यवस्थेशी निगडित घटकांनी यात सहभाग घ्यावा. प्रामुख्याने प्रशासकीय अधिकारी , लोकप्रतिनिधी, जल अभ्यासक व नागरिक यांच्यात समन्वय प्रस्थापित केल्याशिवाय जलव्यवस्थापनात कार्यात अपेक्षित यश येणार नाही. शेतीसाठी पाण्याचा वापर सर्वाधिक होतो. शेतीही सूक्ष्म सिंचन, ठिबक, तुषारचा वापर करून पाणी बचत केली पाहिजे. आपण आपल्या घरीही छोट्या छोट्या कृतीतून पाणी बचतीला महत्त्व दिले पाहिजे. पाणी व्यवस्थापन कार्यात लोकसहभाग वाढवला पाहिजे. केवळ सरकारवर अवलंबून राहून चालणार नाही. शेततळी व साखळी



या बाबत जल व्यवस्थापनासाठी केलेल्या कामाची सविस्तर माहिती ही त्यांनी पी.पी.टी. च्या माध्यमातून देऊन अत्यंत अभ्यासपूर्ण भाषण दिले. पाण्याची बचत म्हणजेच पाणी निर्मिती होय असे प्रतिपादन शंकरराव चव्हाण महाविद्यालय अर्धापूर येथील भूगोल विभागात कार्यरत प्रा. डॉ. परमेश्वर पौळ यांनी ग्रामीण (कला, वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालय, वसंतनगर ता. मुखेड जि. नांदेड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ' जल व्यवस्थापन काळाची गरज' या विषयावर आयोजित एक दिवसीय राज्यस्तरीय वेबिनार प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून बोलताना केले.

या वेळी उद्घाटकीय मार्गदर्शन करताना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक प्रा. डॉ. शिवराज बोकडे म्हणाले की मानवाच्या ज्या मूलभूत गरजा आहेत त्यात पाणी ही ही मूलभूत गरज आहे. सर्व सजीवासाठी त्याचे अत्यधिक महत्त्व असल्यामुळेच आपण त्याला जीवन असे म्हणतो. पाणी वाचवा करा नाही तर पाणी कपात मिळेल. आपण पावसाचे पाणी अडविले व मुरवले पाहिजे.पूर्वी गावात मातीचे रस्ते होते म्हणून पावसाचे पडलेले पाणी मुरायचे पण आता सिमेंटचे रस्ते आल्यामुळे ते जमिनीत न मुरता वाहून जात आहे. आपण जमिनीच्या पोटातील पाणी बाहेर काढत आहोत. लातूरला दोन वर्षापूर्वी भीषण पाणीटंचाई झाली होती. त्यामुळे रेल्वेने पाणी आणावे लागले. आपल्या विद्यापीठाचे सन्माननीय कुलगुरू डॉ.उध्दवजी भोसले साहेब हे जलव्यवस्थापनासाठी अत्यंत जागरूक आहेत. त्यांनी विद्यापीठात बारा साठवण तलाव उभारून विद्यापीठाला पाण्याबाबत स्वयंपूर्ण बनवले आहे. जलव्यवस्थापनाला लोकचळवळीचे स्वरूप यावे.

अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिदास राठोड म्हणाले की रा.से.यो.ने चांगला विषय व वक्ते निवडल्या यामुळे मला समाधान वाटले. प्रा. डॉ.परमेश्वर पौळ यांनी प्रात्यक्षिकासह हा विषय मांडला आहे. आधी केले मग सांगितले असे त्यांचे काम आहे.आपण जर वेळीच पाण्याचे नियोजन केले नाही तर आपले भविष्य हे नक्कीच संकटमय बनणार आहे. त्यामुळे आपण सर्वांनी पाणी बचतीचा संकल्प केला पाहिजे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. एस.बब्बाराव यांनी करून कार्यक्रम आयोजना पाठीमागची भूमिका विशद केली. पाहुण्यांचा परिचय प्रसिद्धी प्रमुख प्रा. डॉ. रामकृष्ण बदने व आय.क्यू.ए.सी समन्वयक प्रा.बळीराम राठोड यांनी करून दिला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला "हम होंगे कामयाब" हे गीत प्रा. डॉ. महेश पेटेकर यांनी सादर केले. सूत्रसंचलन रा.से.यो. सल्लागार समिती सदस्या प्रा.सौ. अरुणा इटकापल्ले यांनी केले तर आभार रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी प्रा.शंकरय्या कळकेमिमठ यांनी मानले. कार्यक्रमाची तांत्रिक बाजू रा.से.यो. सल्लागार समिती सदस्य प्रा. डॉ.महेश पेटेकर यांनी सांभाळली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समिती सदस्य प्रा. देविदास पवार ,दुसरे सल्लागार समिती सदस्य श्री. रमेश गंगुळे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य अरुणकुमार थोरवे,माजी प्राचार्य डॉ. देविदास केंद्रे,स्टाफ सेक्रेटरी प्रा. डॉ. व्यंकट चव्हाण, सहस्टाफ सेक्रेटरी प्रा.सौ.शिल्पा शेडगे, तसेच महाविद्यालयातील अन्य प्राध्यापक तसेच महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातून प्रा. डॉ.अर्चना देशमुख,प्रा. बालाजी गुरुडे, प्रा. डॉ. बालासाहेब गोडबोले, प्रा.भारत राठोड, प्रा.पाडगीळ,प्रा. डॉ. पांडुरंग आचोले,प्रा. ओमप्रकाश दरक, प्रा. डॉ.अप्पा मरड, डॉ. नितीन पवार,प्रा. डॉ. राजेश कोटलवार,प्रा. सुनिल कदम, प्रा.सुरेश कुलकर्णी, डॉ. नितीन देशमुख व अन्य प्राध्यापक तथा विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

औरंगाबाद ● जालना ● परभणी ● बीड ● लातूर ● हिंगोली ● उस्मानाबाद ● नांदेड ● यवतमाळ ● अकोला ● बुलढाणा ● अहमदनगर ● नाशिक ● नंदुरबार ● धुळे ● पुणे ● रायगड ● मुंबईसाठी औरंगाबाद येथून एकाच वेळी प्रकाशित